# मराठीला प्रोत्साहनासाठी कृती आराखडा तयार करा ; अधिकाऱ्यांना मुख्यमंत्र्यांचे कडक निर्देश

प्रतिनिधी २१ जुलै



**मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी (२० जुलै) सह्याद्री अतिथीगृहात राज्य मराठी विकास संस्थेच्या नियामक मंडळाच्या बैठकीचे अध्यक्षस्थान भूषवले. फडणवीस यांनी राज्यात मराठी भाषेचे जतन, संवर्धन आणि व्यापक वापर करण्यासंदर्भात संबंधित विभागांना स्पष्ट आणि कडक सूचना दिल्या. प्रशासन, शिक्षण, तंत्रज्ञान आणि सार्वजनिक जीवनात मराठी भाषेचा अधिक प्रभावी वापर सुनिश्चित करण्यासाठी, मराठी भाषेला प्रोत्साहन देण्यासाठी एक व्यापक आणि कालमर्यादित कृती आराखडा तयार करण्याचे निर्देश फडणवीस यांनी अधिकाऱ्यांना दिले. ते म्हणाले की, मराठी ही केवळ एक भाषा नसून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक अस्मितेचा आणि वारशाचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ आहे. त्यामुळे, तिच्या संवर्धनासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम केले पाहिजे. मुख्यमंत्र्यांच्या निर्देशानुसार, संबंधित विभाग मराठी भाषेच्या वापराला प्रोत्साहन देण्यासाठी एक सविस्तर कृती आराखडा तयार करतील. यामध्ये विविध सरकारी कार्यालये, शैक्षणिक संस्था आणि सार्वजनिक सेवांमध्ये मराठीचा वापर जास्तीत जास्त करण्यावर लक्ष केंद्रित केले जाईल. या आराखड्यामुळे नागरिक सरकारी योजना, माहिती आणि सेवा त्यांच्या मातृभाषेत सहजपणे मिळवू शकतील, हे देखील सुनिश्चित होईल. शासकीय कामात मराठीचा वापर वाढेल. शासकीय पत्रव्यवहार, अधिसूचना, संकेतस्थळे, डिजिटल सेवा आणि नागरी सुविधा शक्य तितक्या प्रमाणात मराठीत उपलब्ध करून देण्याचे सरकारचे उद्दिष्ट आहे. यामुळे जनतेला शासकीय सेवा मिळवणे सोपे होईल आणि भाषेच्या वापराला प्रोत्साहन मिळेल. विविध विभागांनी मराठीत दस्तऐवज तयार करण्यावर आणि अधिकारी व कर्मचाऱ्यांना आवश्यक प्रशिक्षण देण्यावरही भर दिला जाऊ शकतो.

**शिक्षण आणि तंत्रज्ञानावर भर**

शाळा आणि उच्च शिक्षण संस्थांमध्ये मराठी भाषेच्या अभ्यासाला आणि वापराला प्रोत्साहन देण्यासाठीच्या उपाययोजनांचाही कृती आराखड्यात समावेश असू शकतो. डिजिटल प्लॅटफॉर्म, मोबाईल ?प्लिकेशन्स आणि ई-गव्हर्नन्स सेवांवर मराठी मजकुराची उपलब्धता वाढवण्यावरही विशेष लक्ष दिले जाईल. तज्ज्ञांच्या मते, एखाद्या भाषेच्या दीर्घकालीन विकासासाठी डिजिटल माध्यमांमध्ये तिचे मजबूत अस्तित्व असणे महत्त्वाचे आहे.

# महाराष्ट्रात मान्सून पुन्हा सक्रिय होणार, कोकणात 48 तासांत पाऊसधारा ; 16 जिल्ह्यांना 'यलो अलर्ट'

प्रतिनिधी २१ जुलै

**मुंबई :** मुंबई ठाणे जिल्ह्यांमध्ये सोमवारी मुसळधार पावसाची शक्यता आहेत. हवामान विभागाने सकाळी सात वाजता सतर्कतेचा इशारा दिला आहे. त्यासह पुणे जिल्ह्यातही घाटमाथ्यावर आज जोरदार पाऊस होण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

**कोकणातील हवामान कसं असेल?**

पावसाचा जोर ओसरला होत तेव्हाही कोकण किनारपट्टीवर तुरळक ठिकाणी पाऊस सुरू होता. २० जुलै रोजी रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात हलक्या सरींची शक्यता आहे. दरम्यान रायगड जिल्ह्यात मुसळधार पाऊस होण्याचा अंदाज वर्तवला जात आहे.

उत्तर महाराष्ट्र आणि खान्देशातील हवामान कसं असेल?उत्तर महाराष्ट्रात धुळे, नंदुरबार आणि अहिल्यानगर जिल्ह्यांमध्ये सोमवारी हलक्या पावसाची शक्यता आहे. नाशिक जिल्ह्यातही पावसाचा जोर कमीच राहील पण घाटमाथ्यावर मध्य वादळी वाऱ्यांसह मध्यम पावसाची नोंद होण्याची शक्यता आहे. जळगाव जिल्ह्यातही पावसाचा जोर कमीच राहील

**पश्चिम महाराष्ट्रात मुसळधार पाऊस**

पश्चिम महाराष्ट्रात आज पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज आहे. मेघगर्जनेसह कोसळणार आहे. कोल्हापूर, सातारा, सांगली आणि सोलापूर जिल्ह्यांमध्ये हलक्या ते मध्यम पावसाचा अंदाज आहे. साताऱ्यात घाटमाथा परिसरात मुसळधार पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे.

**मराठवाड्याती हवामान जाणून घ्या**

मराठवाड्यातही या आठवड्यात मोसमी वाऱ्यांचा वेग वाढला आहे. छत्रपती संभाजीनगर, जालना आणि परभणी जिल्ह्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह पाऊस होण्याचा अंदाज आहे. दरम्यान, बीड, हिंगोली, नांदेड, लातूर आणि धाराशिव जिल्ह्यांमध्येही हलका पाऊस होण्याची शक्यता आहे.

**विदर्भातील हवामान कसं राहील ?**

संपूर्ण महाराष्ट्रात मान्सून सक्रिय झाला असला तरी विदर्भातील वातावरण अजून कोरडचं आहे. रविवारी काही ठिकाणी हलका पाऊस झाला असला तरी सोमवारी पावसाची शक्यता फार कमी आहे. अकोला, अमरावती, भंडारा, बुलढाणा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, नागपूर, वर्धा, वाशिम आणि यवतमाळ जिल्ह्यांत वातावरण शांत असेल. हवामान विभागाकडून कोणताही अलर्ट देण्यात आलेला नाही.

# अनुसूचित जमातीमधील व्यक्तींना धर्मांतरानंतरही सोयी-सवलती? राज्य सरकारच्या उच्चस्तरीय समितीची स्थापना

प्रतिनिधी २१ जुलै

**मुंबई :** विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात नंदुरबार जिल्ह्याच्या नवापूर तालुक्यातील आदिवासी व बिगर आदिवासींचे ख्रिस्ती धर्मगुरू, मिशनरी व त्यांच्या संस्थांनी प्रलोभने दाखवून धर्मांतर करण्यास भाग पाडल्याबाबत लक्षवेधी सूचना उपस्थित करण्यात आली.

अनुसूचित जमातीमधील व्यक्तींनी धर्मांतर केल्यानंतर मिळणाऱ्या सोयी-सवलतींबाबत केंद्र व राज्य सरकारच्या कायद्यांचा अभ्यास करून राज्यासाठी सर्वसमावेशक धोरण तयार करण्यासाठी राज्य सरकारने उच्चस्तरीय समितीची स्थापना केली आहे. आदिवासी विकासमंत्री अशोक वुईके या समितीचे अध्यक्ष असणार आहेत; तर आदिवासी विकास राज्यमंत्री इंद्रनील नाईक या समितीचे उपाध्यक्ष असतील. अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, धर्मरावबाबा आत्राम या समितीचे सदस्य असणार आहेत. त्यांच्यासोबत विधानसभेतील २६ आमदार या समितीचे सदस्य असणार आहेत. विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात नंदुरबार जिल्ह्याच्या नवापूर तालुक्यातील आदिवासी व बिगर आदिवासींचे ख्रिस्ती धर्मगुरू, मिशनरी व त्यांच्या संस्थांनी प्रलोभने दाखवून धर्मांतर करण्यास भाग पाडल्याबाबत लक्षवेधी सूचना उपस्थित करण्यात आली होती. धर्मांतर केल्यानंतर आदिवासी किंवा अनुसूचित जातीच्या मिळणाऱ्या सवलती रद्द व्हाव्यात अशी मागणी त्या वेळी करण्यात आली होती. त्यावर, धोरण ठरविण्यासाठी विधानसभा सदस्यांची समिती स्थापन करण्यात येईल असे सरकारने म्हटले होते. त्या आश्वासनानुसार ही समिती तयार करण्यात आली आहे. आदिवासी विकास विभागाने याबाबतचा शासन निर्णय प्रसृत केला आहे. आमश्या पाडवी, राजेश पाडवी, डॉ. विजयकुमार गावित आदी एकूण २६ विधानसभा सदस्यांचा या समितीत समावेश असणार आहे.

# जे. जे. रक्तपेढीत आर्थिक गैरव्यवहाराची शक्यता ?

प्रतिनिधी २१ जुलै

**मुंबई :** जे. जे. महानगर रक्तपेढीमध्ये वर्षाला होणारे रक्तसंकलन, रक्तवितरण आणि प्रत्यक्षात करण्यात आलेल्या जमा-खर्चाच्या नोंदी यांचा ताळेबंद मांडला, तर या रक्तपेढीत रक्तविक्रीतून कोट्यवधी रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार झाल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.



रक्तदानातून संकलित होणाऱ्या रक्ताचा वापर केवळ रक्तपूर्ततेसाठी होत नाही. तर रक्तपिशवीचे विभाजन (कंपोनण्ट सेपरेशन) करून प्लाझ्मा, पॅक्ड रेड सेल्स (पीआरबीसी) आणि प्लेटलेट असे घटक स्वतंत्र केले जातात. त्यामुळे एका रक्तपिशवीतून एकापेक्षा अधिक रुग्णांना उपचार मिळण्याबरोबरच रक्तपेढीला विविध घटकांद्वारे स्वतंत्र उत्पन्नही मिळते. उपलब्ध आकडेवारीनुसार, सन २०२५मध्ये एकूण २३,५०० रक्तपिशव्यांचे संकलन झाले. यामध्ये ३५० मिली आणि ४५० मिली रक्तपिशव्यांचा समावेश होता. रक्तघटक विघटनानंतर एका पिशवीतून सरासरी २०० ते २५० मिली प्लाझ्मा मिळतो. सरासरी २२० मिली प्लाझ्मानुसार २३,५०० पिशव्यांमधून सुमारे ५१.७० लाख मिली (५,१७० लिटर) प्लाझ्मा उपलब्ध झाला. या प्लाझ्मा प्रक्रियेसाठी प्रतिलिटर सुमारे १,६०० रुपये दर असल्यास यामधून सुमारे ८२.७२ लाख रुपयांचे उत्पन्न यावर्षी मिळाले आहे.

संकलित रक्तातील विविध कारणांमुळे काही पिशव्या वजा केल्यानंतर सुमारे २० हजार रक्ताच्या पिशव्या युनिट वापरासाठी उपलब्ध होतात. सरकारी, तसेच खासगी रुग्णालयांमध्ये प्रतियुनिट १,५०० रुपये दर गृहित धरल्यास या पिशव्यांतून जे. जे. महानगर रक्तपेढीस तीन कोटी रुपयांचे उत्पन्न मिळाल्याची शक्यता आहे. १२ हजार युनिट प्लेटलेटसाठी प्रतियुनिट ४६० रुपये दराने ५५.२० लाख रुपयांचे उत्पन्न रक्तपेढीला मिळाले. या तिन्ही घटकांचा एकत्रित विचार केल्यास सन २०२५मध्ये रक्तसंकलनातून सुमारे चार कोटी ३७ लाख ९२ हजार रुपये इतके उत्पन्न जे. जे. महानगर रक्तपेढीला मिळाले, असे सार्वजनिक आरोग्य विभागातील वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांनी सांगितले.

# तब्बल २१ वर्षांनंतर गजाआड! चोरीच्या गुन्ह्यात फरार आरोपीला खार पोलिसांकडून अटक

प्रतिनिधी २१ जुलै

**मुंबई :** चोरीच्या गुन्ह्यात तब्बल २१ वर्षांपासून फरार असलेल्या आरोपीला खार पोलिसांनी अखेर जेरबंद केले आहे. तांत्रिक माहितीच्या आधारे सापळा रचून विशेष पथकाने सोमवारी ही कारवाई केली. खार पोलीस ठाण्यात सन २००५ मध्ये गुन्हा क्र. २९/२००५ अन्वये भारतीय दंड संहितेच्या कलम ३७९ अंतर्गत चोरीचा गुन्हा नोंद झाला होता. या प्रकरणाचा तपास पूर्ण करून पोलिसांनी दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले होते. मात्र, या गुन्ह्यातील आरोपी जोसेफ अरूणदास जॉर्ज (६०) हा न्यायालयीन सुनावणीस वारंवार गैरहजर राहत असल्याने वांद्रे येथील अतिरिक्त मुख्य महानगर दंडाधिकारी, ९ वे न्यायालयाने ३० सप्टेंबर २०२३ रोजी त्याच्याविरुद्ध जाहिरनामा जारी केला होता. दरम्यान, खार पोलीस ठाण्याचे विशेष पथक आणि तडीपार पथक आरोपीचा शोध घेत होते. तांत्रिक माहितीच्या आधारे आरोपी माहिम येथील प्रगतीनगर परिसरात, माहिम हार्बर रेल्वे स्थानकाजवळ असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली.

यानंतर सोमवारी (२० जुलै २०२६) सकाळी साडेआठच्या सुमारास पोलिसांनी संबंधित ठिकाणी सापळा रचून आरोपीला शिताफीने ताब्यात घेत अटक केली.

# अरे मोदीजींच्या चमच्या, देशाची वाट लावायला देश काय तुमच्या बापाची जाहगीर वाटली काय ? रोहिणी खडसेंच तिखट प्रत्युत्तर

प्रतिनिधी २१ जुलै



**मुंबई :** नीट परीक्षा पेपरफुटी प्रकरणावरुन केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यासाठी दिल्लीत सुरु असलेल्या कॉकरोच जनता पार्टीच्या आंदोलनाची धग आता दिल्लीसह देशभरात पोहचली आहे. अशातच कॉकरोच जनता पार्टीने संसदेवर मोर्चा काढायचे ठरवले होते. मात्र, दिल्ली पोलिसांनी जंतरमंतरवरील आंदोलकांना जागेवरच रोखून धरले आहे. मात्र, यापैकी आंदोलकांचा एक गट थेट संसद भवनाच्या दिशेने गेला. त्यामुळे संसदेच्या परिसरात एकच गोंधळ उडाल. सध्या संसद भवनातील पूर्ण सुरक्षा यंत्रणा हायअलर्टवर आहे. तरदुसरीकडेयाघटनेचेपडसादआताराजयाच्याराजकारणातहीउमटतांनादिसतअहे. अशातचआता भाजप आमदार अतुल भातखळकर यांच्या टीकेला राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्षा रोहिणी खडसे यांनी तिखट प्रत्युत्तर देत सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे.

कॉकरोच मंडळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी करतायत. बापाचा माल आहे का? देशाच्या कोट्यावधी जनतेने मतदान करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सत्तेवर विराजमान केलेले आहे. दिपके आणि ठिपके यांच्या कृपेने ते सत्तेवर बसलेले नाहीत. ते सत्तेवर यावेत म्हणूनच जनतेने मतदान केलेलं आहे. अशा शब्दात भाजप आमदार अतुल भातखळकर यांनी सीजेपीच्या आंदोलनावर टीका केली होती. अशातच या टीकेला रोहिणी खडसे यांनी प्रत्युत्तर देत निशाणा साधला आहे. यावेळी त्या म्हणाल्या की, 'अरे मोदीजींच्या चमच्या, पंतप्रधानांचा राजीनामा मागणे हा बापाचा माल नाही तर देशाची वाट लावायला देश काय तुमच्या बापाची जाहगीर वाटली काय? देशातील कोट्यावधी जनतेने देशाला देशोधडीला लावण्यासाठी सत्ता नव्हती दिली. जी जनता तुम्हाला डोक्यावर उचलून घेऊ शकते ती जनता तुम्हाला उचलून आपटूही शकते. देशातील जनतेला विशेषतः तरुणांना गृहीत धरू नका. अशा शब्दात रोहिणी खडसे यांनी प्रहार केला आहे.

संविधानाने दिलेल्या अधिकाराला लाठीच्या जोरावर चिरडण्याचा प्रयत्न म्हणजे लोकशाहीचा अपमान आहे. दिल्लीतील जंतर-मंतर येथे आंदोलन करणाऱ्या तरुणांवर झालेला पोलिसांचा लाठीचार्ज अत्यंत निषेधार्ह आहे. लोकशाहीत मत मांडण्याचा, प्रश्न विचारण्याचा आणि शांततेत आंदोलन करण्याचा अधिकार हा संविधानाने दिलेला मूलभूत अधिकार आहे. त्या अधिकाराला लाठीच्या जोरावर चिरडण्याचा प्रयत्न म्हणजे लोकशाहीचा अपमान आहे, लोकशाहीवर हल्ला आहे. असेही रोहिणी खडसे म्हणाल्या. तरुणांच्या हातात रोजगार, शिक्षण आणि भविष्याची हमी देण्याऐवजी त्यांच्या हातात जखमा देण्याचे काम होत असेल, तर हा लोकशाहीचा नव्हे तर दडपशाहीचा मार्ग आहे. सरकारने आंदोलकांशी संवाद साधावा, त्यांच्या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घ्यावा! असेही त्या म्हणाल्या.

# कारवाईची 'फेरी' कायम ; महापौरांच्या घाटकोपर वॉर्डमध्ये सहा महिन्यांत 4674 फेरीवाल्यांवर बडगा

प्रतिनिधी २१ जुलै



**मुंबई :** मुंबईत 'एन' वॉर्डपाठोपाठ सर्वाधिक कारवाई 'पी दक्षिण' वॉर्डमध्ये (गोरेगाव) झाली असून सहा महिन्यांत येथे चार हजार तीन अनधिकृत फेरीवाल्यांवर कारवाईचा बडगा उगारण्यात आला.

मुंबईत पात्र फेरीवाल्यांना 'क्यूआर' कोडचे वाटप सुरू असतानाच, अनधिकृत फेरीवाल्यांविरोधातील कारवाईही महापालिकेने कायम ठेवली आहे. जानेवारी ते जून या सहा महिन्यांत मुंबई महापालिकेने ५५ हजार ८६१ अनधिकृत फेरीवाल्यांवर कारवाई केली. यामध्ये मुंबईतील २४ वॉर्डपैकी महापौर रितू तावडे यांच्या 'एन' वॉर्डमध्ये (घाटकोपर-विद्याविहार) सर्वाधिक चार हजार ६७४ फेरीवाले कारवाईच्या जाळ्यात अडकले. रस्ते आणि पदपथांवर अनधिकृतपणे व्यवसाय करणाऱ्या फेरीवाल्यांमुळे पादचाऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागतो. महापालिका नियमित कारवाई करत असली, तरी कारवाईनंतरही अनधिकृत फेरीवाल्यांची संख्या कमी होत नसल्याने रस्ते आणि पदपथ अतिक्रमणमुक्त कधी होणार, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. केंद्र सरकारने २०१४ मध्ये फेरीवाला धोरण जाहीर केले असले, तरी त्याची प्रभावी अंमलबजावणी मुंबईत अद्याप झालेली नाही. दरम्यान, उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार १३ विभागांतील २० संवेदनशील ठिकाणी अनधिकृत फेरीवाल्यांवर विशेष कारवाई सुरू करून ही ठिकाणे फेरीवालामुक्त करण्याचा प्रयत्न झाला. यामध्ये घाटकोपर पूर्व-पश्चिम रेल्वे स्थानक परिसराचा समावेश असलेल्या 'एन' वॉर्डचाही समावेश आहे. 'एन' विभागात सहा महिन्यांत ४ हजार ६७४ फेरीवाल्यांवर कारवाई करून सहा लाख ११ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. तसेच खाद्यपदार्थ विक्रेत्यांकडून ३३ अनधिकृत गॅस सिलिंडर जप्त करण्यात आले. मुंबईभरातील कारवाईत महापालिकेने ५५ हजार ८६१ अनधिकृत फेरीवाल्यांवर दंडात्मक कारवाई करून ७५ लाख १५ हजार २६० रुपयांचा दंड वसूल केला. तसेच ६७८ अनधिकृत गॅस सिलिंडर जप्त करण्यात आले.

# कल्याण–डोंबिवलीकर वाऱ्यावर, केडीएमसीची परिवहन सेवा पूर्णपणे ठप्प, कामबंदचा फटका

प्रतिनिधी २१ जुलै



**मुंबई :** कल्याण-डोंबिवली महापालिकेची परिवहन सेवेचे ब्रीदवाक्य जरी 'सेवेशी तत्पर' असे असले तरी आज ही सेवा पूर्णपणे ठप्प झाली आहे. कंत्राटदाराकडून कोणतीही पूर्वकल्पना न देता कंत्राटी चालक, वाहक आणि कर्मचाऱ्यांच्या पगारातून रक्कम कपात करण्यात आल्याचा आरोप करत कर्मचाऱ्यांनी बेमुदत कामबंद आंदोलन पुकारले आहे. त्यामुळे ख्श्ऊ डेपोतून एकही बस रस्त्यावर उतरली नसून प्रवाशांचे मोठे हाल होत आहेत. दरम्यान, मनसेचे कल्याण जिल्हाध्यक्ष उल्हास भोईर यांनी कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकण्याची मागणी करत प्रशासनाला आक्रमक इशारा दिला आहे. कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या परिवहन विभागातील कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या पगारातून मोठ्या प्रमाणात रक्कम कपात करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. या कपातीबाबत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने संबंधित अधिकारी आणि कंत्राटदाराकडे लेखी स्वरूपात स्पष्टीकरण मागितले होते. मात्र, त्याला कोणतेही उत्तर मिळाले नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. यामुळे संतप्त झालेल्या चालक, वाहक आणि इतर कंत्राटी कर्मचाऱ्यांनी सामूहिक रजा घेत बेमुदत कामबंद आंदोलन सुरू केले आहे. संपामुळे ख्श्ऊ ची बससेवा पूर्णपणे ठप्प झाली असून डेपोतून एकही बस बाहेर पडलेली नाही. याचा फटका सकाळपासून कल्याण आणि डोंबिवलीकरांना बसला आहे. याप्रकरणी मनसेचे कल्याण जिल्हाध्यक्ष उल्हास भोईर यांनी कामगारांवर अन्याय करणाऱ्या कंत्राटदाराला तात्काळ काळ्या यादीत टाकण्याची मागणी केली आहे. तसेच, कर्मचाऱ्यांचे थकीत वेतन तातडीने न दिल्यास अधिकारी आणि कंत्राटदाराला ख्श्ऊ डेपोमध्ये प्रवेश करू देणार नसल्याचा आक्रमक इशाराही त्यांनी दिला आहे.

# वन नेशन वन इलेक्शन घ्यायचं ना ? मग आजच निवडणुका जाहीर करा ; उद्धव ठाकरे यांचं केंद्राला आव्हान

प्रतिनिधी २१ जुलै



**मुंबई :** सोनम वांगचुक आणि अभिजीत दीपके यांनी जंतरमंतर येथे नीट पेपरफुटी प्रकरणी सुरु केलेल्या आंदोलनाला उद्धव ठाकरे यांनी साथ देत मुंबईतून आंदोलनाची सुरुवात केली. उद्धव ठाकरे यांनी या आपण आता मी दिल्लीला जाणार आहे. महाराष्ट्र आज इथे जंतरमंतर पुरतं मर्यादित ठेवायचं नाही. देशाच्या कानाकोपऱ्यात हे गेलं पाहिजे गली गली में शोर है ची घोषणा गावागावात गेली पाहिजे असे म्हणत देशभर आंदोलन करण्याची घोषणा आज दादर येथील शिवाजी पार्क येथे केली. मोदीजी तुम्हाला वन नेशन वन इलेक्शन घ्यायचं ना? मग आजच घ्या, आम्ही तयार आहोत असे आव्हानच उद्धव ठाकरे यांनी केंद्र सरकारला केले.

उद्धव ठाकरे यांनी सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक आणि अभिजीत दीपके यांच्या आंदोलनाला पाठींबा देण्यासाठी दादर येथे रविवारी आंदोलन केले आहे. या वेळी उद्धव ठाकरे म्हणाले की या ठिकाणी महिला आल्या आहेत. आपल्या घरात आपण साधी माणसं आहोत. घरात साधी महिला झुरळाला घाबरते असं मानलं जातं. इथे आपले पंतप्रधान झुरळाला घाबरतात. सरकार घाबरतं. जगातील मोठा पक्ष झुरळाला घाबरतो. भाड्याने माणसं घेतली. सत्ताधारी झुरळाला का घाबरतात हे आता कळलं. कारण हे भाडखाऊ आहेत. चोरून आणलेली माणसं आहेत. यांच्याकडे यांचं कुणी नाही म्हणून हे झुरळाला घाबरतात असाही टोला उद्धव ठाकरे यांनी यावेळी लगावला.

मोदींना आव्हान आहे. वन नेशन वन इलेक्शन घ्यायचं ना. आता निवडणूक जाहीर करा. आम्ही तयार आहोत.

[redacted]